किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१५/२०२६
कुसूम व इतर वि. निरंक

**MHBI100009992026**

## निशाणी १ वरील आदेश

(पारीत दि. १८.०८.२०२६)

सदरचा अर्ज हा अर्जदाराने सेक्शन २ बॉम्बे रेगुलेशन कलम १८२७ (८) नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदारांच्या म्हणण्यानुसार ते मयत **लालासाहेब बंकट वेताळ** यांचे वारस आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक **१८.०६.२०२६** रोजीच्या दैनिक वृत्तपत्र ''**संकेत**'' या वर्तमानपत्राद्वारे आक्षेप मागविण्यात आले होते. मात्र अर्जदारांच्या मागणीबाबत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

३) अर्जदार असे कथन करतात की, मयत **लालासाहेब बंकट वेताळ** हे कायमचे मौजे विडा, ता. केज जि.बीड येथील रहीवासी होते. **लालासाहेब बंकट वेताळ** यांचा दिनांक २५.१२.२०२५ रोजी केईम हॉस्पीटल, मुंबई येथे मृत्यू झाला आहे. मयत **लालासाहेब बंकट वेताळ** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ ही आई, अर्जदार क्र.३ ते ५ हया विवाहित मुली व अर्जदार क्र.६ हा मुलगा आहे. मयतास अर्जदार क्र.१ ते ६ यांच्या शिवाय इतर कोणीही अन्य जवळचे कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

४) अर्जदारांनी आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ अभिलेखावर **निशाणी क्र.२०** द्वारे मयत **लालासाहेब बंकट वेताळ** यांचे मृत्युप्रमाणपत्र, अर्जदार क्र.१ ते ६ यांच्या आधारकार्डच्या छायांकित प्रत **निशाणी क्र. ०६ ते ११**, **निशाणी क्र.१२** वर जाहिरनामा नोटिस अहवाल, **निशाणी क्र.१५** वर दैनिक वृत्तपत्र ''**संकेत**'' ची अस्सल प्रत दाखल केली आहे. निशाणी क्र.**१७** वर पुरावा बंद पूरसिस दाखल केली आहे.

५) सदरचा अर्ज/प्रकरण सिध्द करण्यासाठी **अर्जदार क्र.१ कुसुम लालासाहेब वेताळ** यांनी स्वतःला **निशाणी क्र.१६** अन्वये पुरावा शपथपत्रावर तपासले. त्यांनी मुळ अर्जातील संपूर्ण वस्तुस्थिती प्रतिज्ञालेखमध्ये पुनरुच्चार केला. सदर साक्षीदाराने अर्जदाराच्या कथनास समर्थन केले. अर्जदाराचा पुरावा यास कोणीही आक्षेप घेतला नाही. तसेच अर्जदाराचा पुरावा हा खंडन करण्यासारखा नाही, म्हणुन अर्जदाराचा प्रतिज्ञालेखातील पुरावा हा अबाधित

राहिला आहे.

६) अभिलेखावरील दाखल केलेले संपूर्ण दस्तऐवज यास कोणीही आक्षेप घेतला नाही. तसेच अर्जदाराने दाखल केलेले दस्तएवज हे खंडन करण्यासारखे नाही. अभिलेखावर अर्जदाराने दाखल केलेले संपूर्ण दस्तएवज हया अर्जदारांचे अर्जास व पुराव्यात सुसंगत आहे. दैनिक वृत्तपत्र **'संकेत'** या वृत्तपत्रात जाहिरनामा प्रकाशीत केल्यानंतर दिलेल्या मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविला नाही. म्हणुन अर्जदारांचा अर्ज, पुरावा अभिलेखावरील सर्व दस्तएवज यावरुन असे आढळुन येते की, अर्जदार हे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१ अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२ अर्जदार क्र. **१) कुसुम लालासाहेब वेताळ, २) सुशीला बंकट वेताळ, ३) काजल अनिल रोकडे, ४) कोमल लालासाहेब वेताळ, ५) आरती उध्दव कांबळे व ६) आदित्य लालासाहेब वेताळ** हे **मयत लालासाहेब बंकट वेताळ** यांचे कायदेशीर वारस असल्याचे उद्घोषीत करण्यात येते.

३ नियमानुसार मुद्रांक शुल्काची आकारणी करुन वारसा प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2026.08.18 16:50:40 +0530

**(एस. एस. बडगुजर)**
सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर,केज

दि. १८.०८.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 18.08.2026 |
| Transcribed on | : --- |
| Checked & signed on | : 18.08.2026 |

Sd/-
( P. P. Raut ),
Stenographer Gr.3
Ct. of CJJD and JMFC, Kaij.